N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** एरंडोल
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0007 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/01/2025 19:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 20/01/2025
**Date To ( दिनांक पर्यत):** 20/01/2025
**Time From (वेळेपासून):** 12:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/01/2025 **Time (वेळ):** 19:32 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 022
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/01/2025 19:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 10 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जिल्हा परीषद केंद्र शाळा पिंपळ,मुख्याद्यापक कार्यालयात

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सागर दिलीप पाटील

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राप्लाट नं32, न्यु बालाजी न,पारोळा ,एरंडोल,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राप्लाट नं32, न्यु बालाजी न,पारोळा ,एरंडोल,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9960393005

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बळीराम सोमा सोनवणे | | | 1. राप्लाट नं13 देविदास कलनी , जळगाव,एरंडोल,जळगाव, महाराष्ट्र,भारत |
| 2 | जे.डी पाटील | | | 1. पंचायत समिती ताएरंडोल, एरंडोल ,एरंडोल,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपयाचा दोन नोटा | 1,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

1,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

एरंडोल पो.स्टे. भाग 6 गुन्हा रजि.नं. /2025 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम 1988 चे कलम 7 अ प्रमाणे
फिर्यादी -सागर दिलीप पाटील वय 37 वर्ष व्यवसाय शिक्षक, रा.प्लाट नं.32, न्यु बालाजी नगर, चोरवड भडगाव रोड, ता.पारोळा जि.जळगाव
आरोपी - 1) बळीराम सोमा सोनवणे वय 56 वर्ष व्यवसाय मुख्याद्यापक रा.प्लाट नं.13 देविदास कॉलनी जळगाव (खाते- जिल्हा परीषद शिक्षण विभाग वर्ग 3)
2) संशयीत आरोपीचे नाव व पत्ता- जे.डी पाटील शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती ता.एरंडोल जि. जळगाव
गुन्हा.घड.ता.वेळ ठिकाण – दि.20/01/2025 रोजी 12.15 वा.चे सुमारास जिल्हा परीषद केंद्र शाळा पिंपळकोठा बु. शाळेतील मुख्याद्यापक कार्यालयात.
गुन्हा दाखल तारीख वेळी व ठिकाण- दि.20/01/2025 रोजी वा.
आरोपी अटक तारीख वेळ- दि. / 01/2025 रोजी वा.
लाचेची मागणी रक्कम- 1000/- हजार रुपये
स्विकारली रक्कम- 1000/- त्यात 500 रुपये दराचा दोन चलनी नोटा अ.पा.लावलेल्या.
सापळा व तपास अधिकारी- योगेश ठाकुर पोलीस उपअधिक्षक अँटी करप्शन ब्युरो जळगाव
खुलासा - यातील फिर्यादी हे जिल्हा परीषद केंद्र शाळा पिंपळकोठा बु ता.एरंडोल जि.जळगाव येथे शिक्षक पदावर व आलोसे हे मुख्याद्यापक पदावर कार्यरत आहेत. सदर शाळेची दि.13/01/2025 रोजी वार्षिक तपासणी झालेली आहे. असे असतांना देखिल आलोसे यांनी शाळेची वार्षिक तपासणी करणारे शिक्षक विस्तार अधिकारी जे.डी पाटील साहेब यांचे तर्फे शाळेच्या वार्षिक तपासणी अहवालात तृटी काढण्यात येव नये या करीता त्यांना खुश करण्यासाठीत त्यांचे नावे आलोसे यांनी फिर्यादीसह शाळेतील त्यांचे ईतर 6 सहकारी शिक्षक यांचेकडे प्रत्येकी 1000 रुपयाची मागणी केलेबाबत दि.20/01/2025 रोजी फिर्यादी यांनी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती. सदर तक्रारीची दि.20/01/2025 रोजी पळताळणी केली असता वर नमुद आलोसे यांनी जिल्हा परीषद केंद्र शाळा पिंपळकोठा बु. शाळेची वार्षिक तपासणी करणारे शिक्षक विस्तार अधिकारी जे.डी पाटील साहेब यांना खुश करण्यासाठी त्यांचे करीता सदर शाळेतील फिर्यादी शिक्षक व त्यांचे सहकारी 6 शिक्षकांना प्रत्येकी 1000 रुपये लाचेची मागणी केली सदर लाच मागणी प्रमाणे त्यांनी शाळेतील ईतर सहकारी 5 शिक्षकांकडुन पैसे गोळा करुन जे.डी पाटील साहेबांना वार्षिक तपासणी करीता सर्वाचे वतीने पैसे दिल्याचे सांगुन फिर्यादीकडुन आज दि.20/01/2025 रोजी 12.15 वा.चे सुमारास जिल्हा परीषद केंद्र शाळा पिंपळकोठा बु. शाळेतील मुख्याद्यापक कार्यालयात पंचासमक्ष 1000 रुपये लाच रक्कम स्वत स्विकारल्यानंतर त्यांना रंगे हात पकडण्यात आले आहे. त्यानंतर फिर्यादी यांनी आलोसे यांना साहेबांशी बोलुन घ्या असे सांगितले. त्या प्रमाणे आलोसे यांनी जे डी पाटील साहेबांना फोन करुन फोनचा स्पिकर ऑन करुन ईस्पेक्शन चे कामाचे ते राहीलेल्या 2 शिक्षकांचे 2 हजार रुपये आले आहेत. असे सांगितले तेव्हा त्यांनी मी आता बीजी आहे नंतर फोन करतो असे सांगुन फोन कट केला सदर वेळी जे.डी पाटील साहेबांनी कसले 2 हजार वगैरे असे म्हणुन कोणताही विरोध दर्शविला नाही म्हणुन गुन्हा

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Nilesh Bhikan Gaikwad(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
पोलीस ठाणे अंमलदार
इगतपुरी पो.स्टे
**Name** (नाव): Nilesh Bhikan Gaikw
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस स्टेशन

<u>फिर्याद</u>

एरंडोल पो.स्टे.
दिनांक २०.०१.२०२५

मी सागर दिलीप पाटील, वय ३७ वर्ष, व्यवसाय — शिक्षक, रा. प्लॉट नं.३२, न्यु बालाजी नगर, चोरवड भडगाव रोड,ता.पारोळा, जि.जळगांव. ९९६०३९३००५.

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहतो व जिल्हा परिषद केंद्र शाळा पिंपळकोठे बुद्रुक ता. एरंडोल येथे मार्च २०२२ पासून शिक्षक पदावर नियुक्तीस आहे. श्री.बळीराम सोमा सोनवणे हे आमचे शाळेचे मुख्याध्यापक असुन, सौ.संध्या वैद्य, श्री.शांताराम पाटील, श्रीमती गौरी सपकाळे, श्रीमती वैशाली सोळंके, श्री.प्रिती मानके, श्री.दत्ता मोरे हे माझे सहकारी शिक्षक आहेत.

दि.०९.०१.२०२५ रोजी आमच्या शाळेत विद्यार्थ्यांची दैनंदीन प्रार्थना झाल्यानंतर व दि.१७.०१.२०२५ रोजी शाळेतील मुख्याध्यापक कार्यालयात घेतलेल्या शिक्षकांचे मिटींगमध्ये मुख्याध्यापक श्री.सोनवणे यांनी शाळेची वार्षिक तपासणी घेणारे शिक्षण विस्तार अधिकारी जे.डी.पाटील साहेबांसाठी माझेसह सर्व शिक्षकांकडे प्रत्येकी १ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. त्यापैकी मी व शिक्षक दत्ता मोरे यांनी त्यांना पैसे दिलेले नव्हते. परंतु मागील वर्षी सुध्दा मुख्याध्यापक श्री.सोनवणे यांनी शाळेच्या वार्षिक तपासणीसाठी माझेकडे पैशांची मागणी केली होती. मी त्यांना पैसे दिले नव्हते म्हणुन त्यांनी मला तुमचा सी.आर.खराब करुन टाकीन अशी धमकी दिली होती. म्हणुन मी हया वेळेस नाईलाजास्तव त्यांचे मागणी प्रमाणे शाळेची वार्षिक तपासणी घेणारे शिक्षण विस्तार अधिकारी जे.डी.पाटील साहेबांसाठी १ हजार रुपये लाच रक्कम देण्यासाठी तयार झालो बाबत दि.२०.०१.२०२५ रोजी पोलीस उप अधिक्षक, योगेश ठाकूर, लाचलुचपत प्रतिबंध विभाग,जळगाव यांचेकडे तक्रार लिहुन दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचमागणी पडताळणी करण्यासाठी पोलीस उप अधिक्षक योगेश ठाकूर यांनी मला व पंच श्री.शेळके यांना आवश्यक त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डर चालु करून, ते माझे शर्टचे आतील बाजुस गळयात अडकावुन देवुन मला व त्यांना माझे कडील होंडा युनिकॉर्न मो.सा.क्र.MH-19-DT-3185 द्वारे जळगाव एरंडोल रोडवरील हॉटेल कृष्णा जवळुन मुख्याध्यापक श्री.सोनवणे यांची भेट घेण्यासाठी जिल्हा परिषद केंद्र शाळा पिंपळकोठे बुद्रुक या शाळेतील मुख्याध्यापक कार्यालयात पाठविले होते. त्याप्रमाणे मी व पंच श्री.शेळके अशांनी सदर ठिकाणी गेलो. परंतु मुख्याध्यापक कार्यालय बंद होते. तेव्हा आम्ही तेथे थांबुन असतांना सुमारे ५ मिनीटांनी मुख्याध्यापक श्री.सोनवणे सर त्यांचे मोटर सायकलने शाळेत आले व त्यांचेकडील चाबीने मुख्याध्यापक कार्यालय उघडले.

19:32 वा

पोलीस ठाणे अंमलदार
एरंडोल पो.स्टे.

त्यानंतर ते व आम्ही मुख्याध्यापक कार्यालयात गेलो. तेव्हा मी त्यांना ''तो वार्षिक तपासणीचे मिटींगचा विषय कसा करता मग, काय करायच'' असे विचारले असता त्यांनी मला ''सर्वांनी दिले आहे न तुमचे आणि मोरे सरांचे राहीले आहेत फक्त'' असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना ''द्यावेच लागतील का मग?'' असे विचारले. तो पर्यंत तेथे शाळेतील सहशिक्षीका संध्या वैद्य, गौरी सपकाळे, वैशाली सोळंके, व सहशिक्षक शांताराम पाटील असे मस्टरवर सहया करण्यासाठी आलेले होते. तेव्हा मुख्याध्यापक श्री.सोनवणे यांनी ''हा मग'' असे म्हटले. तेव्हा मी त्यांना ''किती द्यावे लागतील मग?'' असे विचारले. मुख्याध्यापक श्री.सोनवणे यांनी ''त्यांनी दहा सांगीतले आहे मला, एकच द्या न तुम्ही'' असे म्हटले. त्यावर मी त्यांना ''काही कमी होणार नाही का सर'' असे म्हटलो असता त्यांनी ''नाही, उलट जास्त पाहीजे होते मला, एकच त्यांचेकडुन घेतले असे बोलुन शांताराम पाटील सरांना काहो किती घेतले तुमच्याकडुन'' असे विचारले. तेव्हा शांताराम पाटील सरांनी हजार रुपये दिल्याचे सांगीतले.

त्यानंतर झालेल्या चर्चे दरम्यान मी त्यांना ''सी.आर.च बघा,मागच्या वेळे सारख करु नका,चांगला लावा'' असे म्हणालो. तेव्हा त्यांनी ''तुमचेच नाही सर्वांचे ए प्लस लावले आहे. पैसे द्यावे लागत नाही त्या कामाला, आता आपण हे देतोच आहे न, ते वैयक्तीक आहे त्यांचे ते वार्षिक काम आहे त्यासाठी लागतात'' असे बोलुन शाळेची वार्षिक तपासणी घेतलेल्या साहेबांसाठी १ हजार रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना १५—२० मिनीटात पैसे

घेवुन येतो ए.टी.एम.मधुन असे सांगुन सापळा पथका जवळ परत येवुन,घडलेली हकीकत सापळा पथकास सांगितली. त्यानंतर सापळा पथकाने माझे व मुख्याध्यापक श्री.सोनवणे यांचेमधील संभाषण ऐकुण लाच मागणी बाबत खात्री केली होती.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक योगेश ठाकूर यांनी मला,पंच श्री.शेळके व सापळा पथकास पुढील सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी माझे जवळील १ हजार रूपये (त्यात ५०० रुपये दराच्या २ नोटा) सापळा पथकाकडे दिल्या. पंचासमक्ष सदर नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन घेण्यात आले. व सदर नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन, त्या माझ्या शर्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन देण्यात आल्या.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक योगेश ठाकूर यांचे सुचने प्रमाणे व्हाईस रेकॉर्डर चालु करून, माझे शर्टचे आतील बाजुस गळयात अडकावुन देण्यात आले. त्यानंतर त्यांनी मला व पंच श्री.शेळके अशांना माझे मोटर सायकलने मुख्याध्यापक श्री.सोनवणे यांना १ हजार रुपये लाच रक्कम देण्यासाठी जिल्हा परिषद केंद्र शाळा पिंपळकोठे बुद्रक या शाळेतील मुख्याध्यापक कार्यालयात पाठविले होते. त्याप्रमाणे आम्ही सदर ठिकाणी जावुन मुख्याध्यापक श्री.सोनवणे यांची भेट घेतली. तेव्हा मी त्यांना ''ते इन्सपेक्शनचे १ हजार रुपये काढुन आणले'' असे म्हटलो. त्यांनी ''म द्या न म'' असे बोलुन लाच रक्कमेची मागणी केली. तेव्हा मी पुन्हा त्यांना ''काही डिस्काउंट, मी ज्युनीयर आहे, ५०० रुपये'' असे म्हटलो. तेव्हा त्यांनी ''मला दहाच सांगीतले आहे, कुठुन देवु मी सांगा मला'' असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना ''ठिक आहे जाउ द्या बाकी संगळयांचे आले का मग असे बोलुन माझे शर्टचे पुढील डाव्या बाजुच्या खिश्यातुन १ हजार रुपये लाच रक्कम काढुन त्यांना दिली.सदरची लाच रक्कम स्विकारुन त्यांचे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन घेतली. त्यानंतर त्यांना साहेबांशी बोलुन घ्या असे सांगीतले. त्याप्रमाणे त्यांनी जे.डी.पाटील साहेंबाना फोन करुन, फोनचा स्पिकर ऑन करुन इन्सपेक्शनचे कामाचे ते राहीलेल्या २ शिक्षकांचे २ हजार रुपये आले आहेत असे सांगीतले. तेव्हा त्यांनी मी आता बिझी आहे, नंतर फोन करतो असे सांगुन फोन कट केला. सदर वेळी जे.डी.पाटील साहेबांनी कसले २ हजार वगैरे असे म्हणुन कोणताही विरोध दर्शवला नाही.

त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे मुख्याध्यापक कार्यालयाबाहेर येवुन माझे डोळयावरिल चष्मा काढुन सापळा पथकास लाच रक्कम स्विकारले बाबत ईशारा केला. त्यानंतर सापळा पथकाने मुख्याध्यापक श्री.सोनवणे यांना जागीच त्यांचे कार्यालयात लाच रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले होते. तसा संपुर्ण सापळा कार्यवाहीचा पंचनामा करण्यात आला आहे.

तरी लोकसेवक श्री.वळीराम सोमा सोनवणे,वय ५६ वर्षे, मुख्याध्यापक, रा.प्लॉट नं.१३, देविदास कॉलनी, जळगाव यांनी दि.१३.०१.२०२५ रोजी जिल्हा परिषद केंद्र शाळा, पिंपळकोठा बुद्रुक,ता.एरंडोल,जि.जळगाव शाळेची वार्षीक तपासणी करणारे शिक्षण विस्तार अधिकारी जे.डी.पाटील साहेब यांचेकरिता माझे व शाळेतील ६ सहकारी शिक्षकांकडे प्रत्येकी १ हजार रुपये प्रमाणे लाचेची मागणी केली. सदर लाचमागणी प्रमाणे त्यांनी शाळेतील इतर सहकारी शिक्षकांकडुन पैसे गोळा करुन, जे.डी.पाटील साहेबांना वार्षिक तपासणी करिता सर्वांचे वतीने पैसे दिल्याचे सांगुन, माझेकडुन आज दि.२०.०१.२०२५ रोजी १२.१५ वा.चे सुमारास जिल्हा परिषद केंद्र शाळा, पिंपळकोठा बुद्रुक शाळेतील मुख्याध्यापक कार्यालयात पंचासमक्ष १ हजार रूपये लाच रक्कम स्वत: स्विकारली. तसेच त्यांनी जे.डी. पाटील साहेंबाना फोन करुन, फोनचा स्पिकर ऑन करुन इन्सपेक्शनचे कामाचे ते राहीलेल्या २ शिक्षकांचे २ हजार रुपये आले आहेत असे सांगीतले. तेव्हा त्यांनी मी आता बिझी आहे, नंतर फोन करतो असे सांगुन फोन कट केला. सदर वेळी जे.डी.पाटील साहेबांनी कसले २ हजार वगैरे असे म्हणुन कोणताही विरोध दर्शवला नाही. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

समक्ष

(सही)

योगेश जी. ठाकुर
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

ही फिर्याद दिली,
सही,दि.२०.०१.२०२५

(सही)